## एनबीए कार्यशाळा

# औद्योगिक क्षेत्रातील प्रात्यक्षिक ज्ञान मिळविणे आवश्यक

प्रतिनिधी

सोलापूर, दि. ४- उद्योग आणि शिक्षणाची खऱ्या अर्थाने सांगड घालण्यासाठी प्रत्येक शैक्षणिक क्षेत्रातील प्राध्यापकाने किमान एक महिना औद्योगिक क्षेत्रातील प्रात्यक्षिक ज्ञान मिळविणे आवश्यक आहे. त्यामुळे उद्योगांची खरी गरज शिक्षकांना लक्षात येईल आणि त्याप्रमाणे त्यांना विद्यार्थी घडविणे सोपे जाईल. उद्योगशील गुणवाढीसाठी निर्मिती मूल्यांकन शिक्षणाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रिसीजन उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा यांनी केले.



वालचंद इन्स्टिट्यूटमध्ये नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडेशन आयोजित तीनदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन करताना उद्योजक यतीन शहा. यावेळी प्राचार्य डॉ. शशीकांत हलकुडे, डॉ. शैलजा सुब्रमण्यम, भूषण शहा, डॉ. सचिन गेंगजे.

श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाला संचलित वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडेशन (एनबीए) आयोजित 'प्रशिक्षित संशोधकांचे संशोधनातील गुणात्मक परिणाम' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनपर भाषणात शहा बोलत होते. यावेळी संस्थेचे खजिनदार भूषण शहा, प्राचार्य डॉ. शशिकांत हलकुडे, सांगली येथील डॉ. शैलजा सुब्रमण्यम, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. सचिन गेंगजे उपस्थित होते.

शहा पुढे म्हणाले, औद्योगिक क्षेत्राच्या अनेकपटीने शिक्षणक्षेत्राची वाटचाल असायला हवी. दुर्दैवाची गोष्ट, शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञ उद्योगविश्वात आणि उद्योगविश्वातील तज्ज्ञ शिक्षणक्षेत्रात लक्ष घालत नाहीत. सगळेच प्राध्यापक संशोधनात्मक लेख प्रसिध्द करण्याकडे अधिक वेळ खर्च करीत असतात. वास्तविकत: उद्योगातील समस्या सोडविण्यासाठी शिक्षकांनी लक्ष दिले पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने शिक्षण आणि उद्योगाची सांगड घालणे शक्य होणार आहे.

ऑटोमोबाइल उद्योगाची माहिती देताना शहा म्हणाले, चीन केवळ स्वत:च्या देशासाठी प्रति महिन्याला २१ दशलक्ष कार बनवित आहे. त्यातुलनेत अमेरिका १३ दशलक्ष आणि युरोप केवळ ८ दशलक्ष कार बनवित आहे. यावरून चीन जगाच्या पुढे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील तंत्रज्ञान रोजच्या रोज विकसित करण्याबाबत नियोजन केले जाते. अगदी त्याच पध्दतीने प्रत्येकाने रोजचे 'नॉलेज अपडेट' करण्याची गरज असल्याचे शहा यांनी यावेळी स्पष्ट केले.

इंटरनेटच्या माध्यमातून खुले झालेल्या माहिती तंत्रज्ञानाची खुली दालने म्हणजे ज्ञान नसून मिळालेल्या माहितीचा उपयोग व्यवहारोपयोगी करून घेणे म्हणजे ज्ञान असल्याचे डॉ. सुब्रमण्याम यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. हलकुडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सतीश काशीद आणि प्रा. प्रतिभा याळगी यांनी केले. आभार प्रा. शशिकांत गोसावी यांनी मानले.